## जिल्हा उद्योग केंद्र, बीड
## दिनांक ०९/०२/२०२४ रोजी मा. जिल्हाधिकारी बीड यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या निर्यात प्रचालन समिती सभेचे इतिवृत्त.

---

दिनांक ०९/०२/२०२४ रोजी दु. ०५.०० वा. मा. जिल्हाधिकारी, बीड यांचे अध्यक्षतेखाली निर्यात प्रचालन परिषद समितीची बैठक संपन्न झाली. सदर सभेस उपस्थित अधिकारी / प्रतिनिधी यांची यादी सोबत जोडली आहे. सर्वप्रथम महाव्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्र, बीड यांनी सभेस उपस्थित असलेल्या सर्व अधिकारी व प्रतिनिधी यांचे स्वागत करुन मा. अध्यक्ष यांच्या परवानगीने सभेस सुरुवात केली.

सभेच्या सुरुवातीस महाव्यवस्थापक यांनी निर्यात बाबत तसेच बीड जिल्ह्यातुन होणा-या मालाच्या निर्याती बाबतची माहिती सभागृहास दिली. तसेच बीड जिल्ह्यातुन निर्यात केल्या जाणा-या उत्पादनांबाबत माहिती दिली. बीड जिल्हयातुन मार्च २०२३ अखेर रु. ६६३ कोटीची निर्यात झाली असुन चालु वर्षात ऑक्टोंबर २०२३ अखेर केवळ रु. १४५ कोटींचे निर्यात झालेली आहे कारण बीड जिल्ह्यातुन बहुतांशी निर्यात ही साखरेची होत असते परंतु चालु वर्षात केंद्र सरकारकडुन साखरेच्या निर्यातीवर Partial Restriction असल्यामुळे जिल्ह्याच्या निर्यातीवर त्याचा परिणाम झाल्याचे सांगितले. बीड जिल्ह्यातुन ODOP साठी १. Beed Custard Apple (Agri/GI) २. Cotton Bales & Cotton Seed Oil (Industrial) दोन उत्पादने निश्चित करण्यात आलेले आहेत.

खालील प्रमाणे निर्यातवाढीसाठी चर्चा करण्यात आली.

१. महाराष्ट्र शानाने निर्यात विषयक धोरण २०२३ नुकतेच जाहीर केले असुन त्यामध्ये विविध बाबींवर प्रोत्साहनपर अनुदाने जाहीर केले आहे.
२. जिल्हा पातळीवर नविन संभाव्य निर्यातक्षम उत्पादने जसे की, Cotton related products, Pomo garnet, Soyabean Products, Auto component व डाळींब, मोसंबी यांमुळे निर्यात वाढु शकेल.
३. नविन निर्यातदारांचा शोध घेवुन एकूण निर्यातीत वाढ करणे.
४. ODOP उत्पादनाचे आंतरराष्ट्रीय पातळीवर वाढीसाठी सदर उत्पादनांचे पॅकेजिंग, ब्रॅन्डींग इ. साठी शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालय बीड यांचे सोबत सामंजस्य करार करण्यात आल्याचे सभागृहाच्या निदर्शनास आणले.

बीड जिल्ह्यातुन निर्यात वाढविण्यासाठी येणा-या अडचणी बाबत सविस्तर चर्चा करण्यात आली त्यात मुख्यता नेहमीप्रमाणे उद्योजक / संघटना / निर्यातदार यांनी खालील प्रमाणे अडचणी सांगितल्या.

१. उत्पादक शेतक-यांमध्ये निर्याती संदर्भात जागृती निर्माण करणे.
२. वाहतुकीसाठी परळी ते आष्टी रेल्वे मार्ग सुरु करणे अत्यंत आवश्यक आहे.
३. शितगृहाची पुरेशी व्यवस्था नाही ती उभारण्याची अत्यंत गरजेचे आहे त्याकरिता शासनस्तरावर प्रयत्न होणे गरजेचे आहे.
४. निर्यातदार आणि उत्पादक यांच्यामध्ये चर्चा होणे गरजेचे.
५. उत्पादीत मालाची वाहतुक करण्यासाठी कंटेनर सुविधा उपलब्ध नाही.
६. आधुनिक प्रयोग शाळा व पॅकेजिंग हाऊस सुविधा शासना मार्फत पुरविण्यात याव्यात.
७. बँकाकडुन लेटर ऑफ क्रेडिटसाठी (LC) प्रतिसाद मिळत नाही त्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे.
८. DGFT कार्यालय पुणे यांचे प्रतिनिधी सदर सभेस हजर राहत नसल्यामुळे निर्यात दारांना योग्य ते मार्गदर्शन होत नाही.

उपरोक्त प्रमाणे चर्चा झाल्यानंत्तर शेवटी महाव्यवस्थापक यांनी सर्व उपस्थित अधिकारी यांचे आभार मानुन मा. अध्यक्ष यांच्या परवानगीने सभा संपल्याचे घोषित केले.

महाव्यवस्थापक, तथा सदस्य सचिव,
जिल्हा निर्यात प्रचालन समिती, बीड

मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,
जिल्हा निर्यात प्रचालन समिती, बीड

ZUM Meeting 09-02-2024-Minitus

Scanned with OKEN Scanner